मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवड तहसीलदार कार्यालयासमोर जनआक्रेश!

## राज्यात कायदा व सुव्यवस्था ढासळली : राजकीय वरदहस्तामुळे जिल्ह्या-जिल्ह्यांत गुंडांच्या टोळ्या तयार

**पिंपरी | प्रतिनिधी**

गेल्या अनेक महिन्यांपासून राज्यात कायदा व सुव्यवस्था ढासळलेली दिसून येत आहे. गुंडगिरी, बलात्कार, खून, दरोडे, धमकावणे, खंडणीचे प्रमाण वाढले आहे. राजकीय वरदहस्तामुळे जिल्ह्या-जिल्ह्यांत गुंडांच्या टोळ्या तयार झाल्या आहेत. त्याच्या निषेधार्थ निगडीतील पिंपरी-चिंचवड तहसीलदार कार्यालयासमोर गुरुवार (ता.९) रोजी जनआक्रोश धरणे आंदोलन करण्यात आले. 'आवाज दिला लेकीने, समाज आला लाखाने', यासारख्या विविध घोषणा आंदोलकांनी दिल्या.



यावेळी नागरी हक्क कृती समितीचे मानव कांबळे, प्रकाश जाधव, संजोग पाटील, माजी आमदार गौतम चाबुकस्वार, माजी नगरसेवक मारूती भापकर, नरेंद्र बनसोडे, शिवशंकर उबाळे, सोमनाथ शेळके, मीना जावळे, प्रताप गुरव, शामराव वीटकर, सुनिता शिंदे, कल्पना गिडडे, शैलजा चौधरी, अजय भोसले, बापू गायकवाड, राजन नायर यांनी संतप्त भावना व्यक्त केल्या. यावेळी संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष सतीश काळे, मराठा सेवा संघाचे शहराध्यक्ष आबासाहेब ढवळे, प्रदीप पवार, अरुण पवार, विश्वनाथ जगताप, गणेश देवराम, विशाल मिठे, विष्णू मांजरे, जयंत गायकवाड, नकुल भोईर, संजय जाधव, शहाजी कारकर, शशिकांत औटी, महेश कांबळे, रवींद्र चव्हाण, शांताराम खुडे, संतोषराजे निंबाळकर, संपतराव जगताप, वसंत पाटील इत्यादी मान्यवरांसह अनेक आंदोलक उपस्थित होते. जीवन बोराडे यांनी आभार मानले. यावेळी आंदोलकांकडून विविध मागण्यांचे निवेदन तहसिलदार जयराज देशमुख यांच्याकडे देण्यात आले.

### लक्षवेधक फलक, बॅनर...

» आंदोलकांच्या विविध घोषणा आणि फ्लेक्स, बॅनरद्वारे सर्व लोकांचे लक्ष वेधून घेतले होते. त्यामध्ये आरोपी वाल्मीक कराडला फाशी झालीच पाहिजे, 'आवाज दिला लेकीने, समाज आला लाखाने', 'सरकार हा असंतोष पहा, न्याय द्या', 'संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्याला संरक्षण देणाऱ्याला बरखास्त करा, अशा अनेक घोषणा आंदोलकांनी दिल्या.

### मागण्या काय होत्या...

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येतील सर्व आरोपींना अटक करावी

देशमुख कुटुंबीय व घटनेचे साक्षीदार यांना पोलिस संरक्षण द्यावे

न्यायालयातून आरोपींना लवकरात लवकर फाशी दिली जावी

आरोपींच्या संपत्तीची ईडीमार्फत चौकशी करावी

परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करावी

राजगुरूनगरमधील लैगिक अत्याचारातील आरोपींवर कडक कायदेशीर कारवाई करावी

---

# मासुळकर कॉलनीतील क्रीडा सुविधांकडे प्रशासनाचा 'कानाडोळा'

## आमदार महेश लांडगे यांनी अधिकाऱ्यांचे कान टोचले : विद्युत पुरवठा, स्वच्छता गृह सुविधा पूर्ववत करण्याची सूचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

अजमेरा मासुळकर कॉलनी येथील डॉ. हेडगेवार मैदान आणि परिसरातील क्रीडा संकुलांमध्ये विद्युतपुरवठा खंडीत झाला होता. तसेच, स्वच्छता गृहाची दुरावस्ता झाली होती. याबाबत भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी महानगरपालिका संबंधित विभागाचे अधिकारी आणि महावितरण अधिकाऱ्यांना चांगलेच खडसावले. तसेच, सदर सुविधा तात्काळ पूर्णवत करण्याची सूचना केली आहे.



अजमेरा मासुळकर कॉलनी येथील पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाच्या डॉ. हेडगेवार मैदान, स्केटिंग ग्राउंड, व्यायामशाळा, बॅडमिंटन हॉल या ठिकाणी गेल्या १५ दिवसांपासून विद्युत पुरवठा खंडीत झाला असून, स्वच्छतागृहाची दुरावस्था झाली आहे. त्यामुळे परिसरातील ज्येष्ठ नागरिक, खेळाडू, व्यायामास येणारी मुले यांची गैरसोय होत आहे. याच्या निषेधार्थ आज आंदोलन करण्यात आले.

यावेळी आमदार महेश लांडगे, अर्जुन ठाकरे, फारुक इनामदार, संजय साळुंखे, तुषार वाघिरे, वैशाली खाडे, संजय मगोडेकर, मोहन पवार, भावेन पाठक, विजय पवार, बबलू सय्यद, किरण पवार, मंगेश कुलकर्णी, माधुरी घोरपडे, माणिकराव अहिराव, हेमंत शिर्के, गणेश जाधव आदी उपस्थित होते.

"अजमेरा मासुळकर कॉलनी परिसरातील सर्वसामान्य नागरिक आणि खेळाडुंच्या डॉ. हेडगेवार मैदान आणि या ठिकाणच्या क्रीडा संकुलांमध्ये पायाभूत सोयी-सुविधांबाबत अनेक तक्रारी आहेत. त्यामुळे आंदोलनस्थळी भेट दिली. महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याशी संपर्क केला आणि तात्काळ कार्यवाही करण्याची सूचना केली. यावर आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना तसे आदेश दिले आहेत. सर्वसामान्य नागरिकांना सक्षमपणे पायाभूत सोयी-सुविधा मिळाल्या पाहिजेत, यासाठी आम्ही प्राधान्याने काम करीत आहोत.

- महेश लांडगे, अमादार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# पुणे वर्तुळाकार रस्ता भूमिपूजन लवकरच!

## दोन्ही प्रकल्पाच्या भूमिपुजनाची तारीख मुख्यमंत्र्यांकडून निश्चित केली जाण्याची शक्यता

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) महत्त्वाकांक्षी अशा पुणे वर्तुळाकार रस्ता आणि जालना-नांदेड द्रुतगती महामार्ग प्रकल्पाच्या भूमिपुजनाची तारीख निश्चित केली जाण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे एमएसआरडीसीच्या प्रकल्पांचा आढावा घेणार आहेत. या आढावा बैठकीत या दोन्ही प्रकल्पाच्या भूमिपुजनाची तारीख मुख्यमंत्र्यांकडून निश्चित केली जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे.




पुण्यातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी एमएसआरडीसीने १६८ किमीचा पुणे वर्तुळाकार रस्ता प्रकल्प हाती घेतला आहे. तर दुसरीकडे समृद्धी महामार्गाचा विस्तार नांदेडपर्यंत करण्याकरीता जालना-नांदेड असा १८० किमीचा द्रुतगती महामार्ग बांधण्याचा निर्णय घेतला आहे. या दोन्ही प्रकल्पाच्या बांधकामासाठीची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून कंत्राटदारांना कार्यदिशही देण्यात आले आहेत. कार्यादेश देऊन बरेच दिवस झाल्याने या प्रकल्पांचे भूमिपूजन केव्हा होणार आणि कामास सुरुवात केव्हा होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. असे असताना आता लवकरच भूमिपूजनाची प्रतीक्षा संपण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री एमएसआरडीसीची एक आढावा बैठक गुरुवारी घेणार आहेत. या आढावा बैठकीत पुणे वर्तुळाकार रस्ता आणि जालना-नांदेड या दोन प्रकल्पाच्या भुमिपूजनाचा निर्णय होण्याची शक्यता सूत्रांनी व्यक्त केली आहे. पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनीही यासंबंधीचे संकेत दिले आहेत.

आता या भूमिपूजनाची तारीख उद्याच्या बैठकीत निश्चित होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. पुणे वर्तुळाकार रस्त्यासाठी पश्चिमेकडील बाजूचे ९६ टक्के भूसंपादन झाल्याने भूमिपूजनाचा मार्ग मोकळा झाला आहे. प्रकल्पाचे भूमिपूजन करत पश्चिमेकडील बाजूच्या कामाला सुरुवात केली जाण्याची शक्यता आहे. पूर्वेकडील बाजूचे ८२ टक्के भूसंपादन झाले आहे. हे भूसंपादनही लवकरच पूर्ण केले जाण्याची शक्यता आहे. जालना-नांदेडचेही भूसंपादन झाले आहे. तेव्हा या द्रुतगती महामार्गाच्या भूमिपुजनाचीही तारीख यावेळी निश्चित केली जाण्याची शक्यता आहे. याविषयी गायकवाड यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

### 90 टक्के भूसंपादनाची प्रतीक्षा

» वर्तुळाकार रस्ता आणि जालना-नांदेड महामार्गाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असली तरी काही प्रमाणात भूसंपादन शिल्लक होते. ९० टक्के भूसंपादनाची प्रतीक्षा होती. त्यामुळे ९० टक्के भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करून नव्या वर्षात या दोन्ही प्रकल्पाचे भूमिपूजन केले जाईल, अशी माहिती काही दिवसांपूर्वी एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी दिली होती.

# शहरात वर्षभरात 15 हजार 909 गुन्ह्यांची नोंद

## शहरात 1 लाखाहून अधिक थकबाकी असणाऱ्या व्यावसायिक मालमत्तांवर जप्तीची कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालया अंतर्गत २३ पोलीस ठाण्याच्या हद्दीत गेल्या वर्षभरात खून, दरोडा, चोऱ्या, लुटमार, फसवणूक, वाहनचोरी, बलात्कार, विनयभंग अशा तब्बल १५ हजार ९०९ गुन्ह्यांची नोंद झाली. गेल्या पाच वर्षांत तब्बल ५ हजार ७६ ने गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे. मात्र, गेल्या दोन वर्षांत पोलीसांनी राबवलेल्या विविध उपाययोजनांमुळे आयुक्तालय हद्दीतील गुन्ह्यांमध्ये तब्बल ५६८ ने घट झाली आहे.

पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे, विवेक पाटील उपस्थित होते. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाअंतर्गत पिंपरी, निगडी, चिंचवड, भोसरी, एमआयडीसी-भोसरी, सांगवी, हिंजवडी, वाकड, दिघी, चिखली, चाकण, आळंदी, देहूरोड, तळेगाव - दाभाडे, तळेगाव एमआयडीसी, शिरगाव, रावेत, म्हाळूंगे आणि नव्याने निर्माण झालेल्या काळेवाडी, बावधन, दापोडी, संत तुकारामनगर आणि सायबर सेल अशा २३ पोलीस ठाण्यांचा समावेश आहे.

औद्योगिक कारखाने, आयटी पार्क यामुळे शहरात रोजगार मोठ्या प्रमाणात उपलब्ध असल्याने नोकरी-धंद्यानिमित्त येणाऱ्या चाकरमान्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असताना विस्तारही वाढत आहे. स्वतंत्र पोलीस आयुक्तालय सुरू झाले असले तरी संख्याबळ मात्र अपुरेच ठरत आहे. शहराचा विकास होताना तो नियोजनपुर्वक न झाल्याने दाट लोकवस्तीसह झोपडपट्ट्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. याचा परिणाम गुन्हेगारीचे प्रमाणही




प्रचंड आहे. हिंजवडी हद्दीत मोठी गावे असून आयटी पार्कसह औद्योगिक परिसरही असल्याने मजुरांची संख्या अधिक आहे. ऑनलाइन फसवणूक, अपघात, वाहनचोरीच्या गुन्ह्यांचे प्रमाण मोठे आहे. पिंपरीत मिश्र लोकवस्ती असून झोपडपट्टीची संख्याही अधिक आहे. गुन्हेगारी घटनांसह आपापासातील भांडणातून गुन्हे दाखल होत असतात. टोळक्याकडून तोडफोडीच्या घटनाही घडल्या आहेत. वाकड हद्दीत मोठमोठ्या सोसायट्यांसह चार झोपडपट्टी आहेत. मारहाण, कौटूंबिक हिंसाचार, वाहनचोरी, फसवणूक यासारख्या गुन्ह्यांचे प्रमाण अधिक आहे. चाकण, महाळूंगे हा औद्योगिक परिसर असल्याने कंपन्यांची संख्याही अधिक आहे.

परराज्यातील लोक मोठ्या प्रमाणात वास्तव्यास असून कामगारांची संख्याही जास्त आहे. या ठाण्याच्या हद्दीत लूटमार, किरकोळ कारणांसह जमिनीच्या वादातून भांडण असे प्रकार वारंवार घडत असतात. सन २०२० मध्ये जानेवारी ते डिसेंबर या वर्षभराच्या कालावधीत खून, दरोडा, चोऱ्या, लुटमार, फसवणूक, वाहन चोरी, बलात्कार, विनयभंग, कौटूंबिक हिंसाचार अशा विविध तब्बल १० हजार ८३३ गुन्ह्यांची नोंद झाली. सन २०२३ मध्ये वर्षभरात गुन्ह्यांची संख्या १६ हजार ४७७ एवढी होती. म्हणजेच २०२० च्या तुलनेत २०२३ मध्ये ५ हजार ६४४ ने गुन्ह्यांची संख्या वाढल्याचे आकडेवारीवरून दिसून येत आहे. मात्र, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी १४ डिसेंबर २०२२ रोजी पदभार स्विकारल्यानंतर आयुक्तालय हद्दीतील गुन्हेगारांना दणका देण्यास सुरूवात केली. मोक्कांतर्गत ९९ टोळ्यांमधील सुमारे ६०० गुंडांना अटक केली. ४११ अग्निशस्त्रे व १६३३ धारदार शस्त्रे जप्त केली. ५५५ गुन्हेगारांना तडीपार करून ४७ संशयितांवर स्थानबद्धतेची कारवाई केली.

> “ पिंपरी-चिंचवड आयुक्तालयाचा पदभार स्विकारल्यानंतर शहरातील वाढती गुन्हेगारी रोखणे हे आपले उद्दीष्ट होते. गेल्या वर्षभरातील आकडेवारी पाहिल्यास आयुक्तालय हद्दीतील दरोडा, जबरी चोरी, घरफोडी, वाहनचोरी अशा गंभीर गुन्ह्यांच्या संख्येत घट झाली आहे. बालगुन्हेगारी रोखण्यासाठी सर्व बालगुन्हेगारांचा एक डेटा तयार करून दिशा उपक्रमाअंतर्गत गुन्हेगारीतून त्यांचे लक्ष विचलीत करून त्यांना खेळाकडे आकर्षित केले आहे.
>
> - विनयकुमार चौबे, पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड.

# शहरात मिळणार कौशल्यानुरूप रोजगार

## 44 झोपडपट्ट्यांमधील 31 हजार 400 हून अधिक कुटुंबांचे सर्वेक्षण, युवकांच्या कौशल्यानुसार रोजगार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत शहराच्या हद्दीतील ४४ झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या एकूण ३१ हजार ४०० हून अधिक कुटुंबांचे सर्वेक्षण पूर्ण केले आहे. घरोघरी जाऊन केलेल्या या सर्वेक्षणामुळे पीसीएमसीच्या हद्दीतील युवकांची लोकसंख्या, कौशल्ये आणि करिअरची उद्दिष्टे याबाबत महत्त्वपूर्ण डेटा महापालिकेने गोळा केला आहे. या डेटावर आधारित कौशल्य विकास आणि रोजगार कार्यक्रम महापालिकेकडून तयार केले जाणार आहेत.



सर्वेक्षणातून गोळा केलेल्या डेटाच्या मदतीने पीसीएमसीमधील तरुणांसाठी नोकरीच्या संधी उपलब्ध करण्यात महापालिकेला मदत होणार आहे. याबरोबरच तरुणांसाठी जागरुकता मोहिमा, विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आणि पीसीएमसीमधील उद्योगांच्या मदतीने वेगवेगळे उपक्रम राबवण्यातही मदत होणार आहे. सर्वेक्षणाच्या माहितीवर आधारीत अनेक उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यामध्ये कौशल्य विकास कार्यक्रम, आयटी, आरोग्यसेवा आणि उत्पादन क्षेत्रातील उद्योगांच्या गरजांनुसार विशेष अभ्यासक्रम तयार केले जाणार आहेत. सर्व युवकांना या कार्यक्रमांमध्ये सामील होण्यासाठी प्रभावी मोहिमा आखल्या जाणार आहेत. तसेच करिअर मार्गदर्शन सत्रांमध्ये युवकांना योग्य निर्णय घेण्यासाठी मार्गदर्शन देण्यात येणार आहेत.

### काय सांगतो सर्वेक्षणाचा अहवाल?

» या सर्वेक्षणामध्ये ४४ झोपडपट्टी वस्ती, ३१,४०० कुटुंबे, १८ ते ३५ वयोगटाच्या आत असलेले १८,००० युवक असल्याची माहिती महापालिकेला मिळाली. यामध्ये दहावीपर्यंतचे शिक्षण अपूर्ण असलेले २४ टक्के, बारावी उत्तीर्ण असलेले ३४ टक्के आणि पदव्युत्तर अथवा डिप्लोमा पूर्ण असलेले २ टक्के युवक असल्याचे निष्पन्न झाले. यापैकी २१ टक्के युवकांनी व्यवसायिक प्रशिक्षण पूर्ण केले आहे आणि १६ टक्के युवक पाच किंवा अधिक नोकरीच्या संधींबद्दल जागरूक आहेत.

“ या सर्वेक्षणाच्या निष्कर्षांमुळे आम्हाला पीसीएमसीमधील तरुणांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी स्पष्ट दिशा मिळाली आहे. भविष्यातील उपक्रमांना प्रभावी स्वरूप देण्यासाठी हे निष्कर्ष उपयुक्त ठरले आहेत. आम्ही तरुणांच्या कौशल्यविकास, करिअर मार्गदर्शन आणि रोजगार निर्मिती यावर विशेष लक्ष केंद्रीत करत आहोत.

**- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महापालिका**

# लाखाहून अधिक थकबाकी असणाऱ्या व्यावसायिक मालमत्तांवर आता कारवाई

## सर्व थकबाकीदारांच्या बिगरनिवासी, औद्योगिक, मिश्र मालमत्तांवर जप्ती कारवाईची धडक मोहिम सुरु

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाकडून एक लाखाहून जास्त थकबाकी असणाऱ्या सर्व थकबाकीदारांच्या बिगरनिवासी, औद्योगिक, मिश्र मालमत्तांवर जप्ती कारवाईची धडक मोहिम सुरु करण्यात आली आहे.



एक लाखाहून अधिक थकबाकी असणाऱ्या थकबाकीदारांच्या मालमत्ता तात्काळ जप्त करण्याचे आदेश संबधित विभागीय कार्यालयातील प्रशासन अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. त्यानुसार, करसंकलन विभागाने शुक्रवार, दिनांक ७ जानेवारीपर्यंत तब्बल ४१८ मालमत्ता जप्त केल्या असून, त्यांच्याकडे तब्बल ११ कोटी ३७ लाख २३ हजार १९८ रुपयांचा मालमत्ता कर थकीत आहे. मालमत्ता जप्ती कारवाईवेळी १५११ मालमत्तांनी आपल्या थकीत कराचा भरणा करून, २६ कोटी ९२ लाख ७३ हजार ७४९ इतक्या कराचा भरणा केलेला आहे.

थकबाकीदारांना वारंवार आवाहन करुन देखील कराचा भरणा केला नसेल अशा मालमत्तांवर जप्तीच्या कारवाईसाठी कठोर पाऊले उचलावीत असेही आदेश करसंकलन मुख्य कार्यालयाकडून विभागीय कार्यालयास देण्यात आले आहेत. शहरातील एक लाखाहून अधिक थकबाकी असणाऱ्यांमध्ये खासगी संस्था, खासगी महाविद्यालये व शाळा, हॉटेल, खासगी रुग्णालये, पेट्रोल पंप, औद्योगिक कारखाने, शोरुम, मंगल कार्यालय, बँक, मॉल, चित्रपटगृहे आदी आस्थापनांचा समावेश आहे.

सदर थकबाकी असणाऱ्या आस्थापनांची यादी करसंकलन विभागाकडून तयार करण्यात आली असून, संबंधित विभागीय कार्यालयास कारवाईसाठी पाठविण्यात आली आहे. याचबरोबर अशा मालमत्तांची यादी वर्तमानपत्रातून प्रसिध्द केली जाणार आहे. त्याचबरोबर अशा थकबाकीदारांना आवाहन करण्यासाठी सदर आस्थापनांच्या बाहेर बँड पथकाकडून बँड वाजविण्यात येणार आहे. याबरोबर सदर मालमत्तांवर चालू स्थितीमध्ये सुध्दा जप्ती करण्याचे आदेश करसंकलन विभागाकडून देण्यात आले असून शहरामध्ये मालमत्ता जप्तीची कारवाई करण्यात येत आहे.

“ शहरातील थकबाकीदारांना वारंवार कर भरण्याचे आवाहन करण्यात आले असून एक लाखाहून जास्त रक्कम थकीत असणाऱ्या मालमत्तांवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार जप्तीची कारवाई करण्यात येत आहे. शहरातील बिगरनिवासी, औद्योगिक, मिश्र मालमत्ता प्राधान्याने जप्त करण्यात येत असून मालमत्ताधारकांनी आपल्या थकीत कराचा तात्काळ भरणा करुन जप्तीची कारवाई टाळावी.

**- प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

“ पिंपरी-चिंचवड शहरातील मोठमोठी हॉटेल, मॉल, पेट्रोल पंप चित्रपटगृहे, मंगल कार्यालये, औद्योगिक कारखाने, खासगी रुग्णालये,आदी. आस्थापनांची एक लाखापेक्षा जास्त थकबाकी असल्यास अशा मालमत्ता जप्त करण्याच्या सूचना संबंधित विभागीय कार्यालयांना दिल्या असून शहरामध्ये मालमत्ता जप्तीची कारवाई मोहिम स्वरुपात राबविण्यात येत आहे. सदर आस्थापनांनी आपला मालमत्ता कर भरल्याची खात्री करावी. वरील आस्थापना चालू स्थिती मध्ये अथवा बंद झाल्यास महानगरपालिका कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.

**- अविनाश शिंदे, सहाय्यक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग.**

# उपमुख्यमंत्री अजित पवारांची पुणे विद्यापीठास सदिच्छा भेट

## विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळाचे सदस्य, संविधानिक अधिकारी आणि व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांबरोबर चर्चा

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज (गुरुवार) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी, प्र - कुलगुरू प्रा. डॉ पराग काळकर, प्रभारी कुलसचिव प्रा. डॉ. ज्योती भाकरे, वित्त व लेखाधिकारी सीएमए डॉ. चारुशीला गायके, व्यवस्थापन परिषद सदस्य, आयआयएलचे संचालक डॉ.देविदास गोल्हार आणि अधिसभा सदस्यांसह इतर संविधानिक अधिकारी उपस्थित होते.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अमृत महोत्सवी वर्ष नुकतेच पूर्ण झाले असून त्यानंतर विद्यापीठाच्या प्रगतीच्या दृष्टीने विद्यार्थी केंद्रित तसेच विद्यापीठ विभाग आणि महाविद्यालयांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने विद्यापीठ करीत असलेल्या नाविन्यपूर्ण योजनांची माहिती याप्रसंगी कुलगुरूंनी उपमुख्यमंत्र्यांना दिली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध कार्यांचा आढावा तसेच या पुढच्या काळामध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या माहितीचे सादरीकरण उपमुख्यमंत्र्यांसमोर करण्यात आले.

विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळाचे सदस्य, संविधानिक अधिकारी आणि व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांबरोबर यावेळी विद्यापीठाच्या भविष्यकालीन योजनांविषयी अनौपचारिक चर्चा करण्यात आली. उच्च शिक्षणामध्ये होत असलेले बदल तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने घडत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती उपमुख्यमंत्र्यांना देण्यात आली. विद्यापीठाच्या संकुलामधील विविध सुविधांच्या अद्ययावतीकरणासंबंधात विद्यापीठाने उचललेली पावलं याची सुद्धा उपमुख्यमंत्र्यांनी माहिती घेतली आणि त्या संदर्भात शासन स्तरावर जी काही मदत प्रशासनाच्या वतीने लागेल त्यासाठी निश्चितपणे महाराष्ट्र शासन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासोबत उभे राहील याची ग्वाही विद्यापीठास दिली.

यावेळी कुलगुरू, प्र - कुलगुरू यांच्यासह व्यवस्थापन परिषद सदस्य रविंद्र शिंगणापूरकर, प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे, प्राचार्य डॉ.नितीन घोरपडे, डॉ.ज्योत्स्ना एकबोटे, डॉ.संगीता जगताप, बागेश्री मंठाळकर, अधिसभा सदस्य सचिन गोर्डे, संदीप कदम आणि इतर संविधानिक व प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

> राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विद्यापीठाच्या विकास कामांची माहिती घेण्यासाठी गुरुवारी सकाळी भेट दिली. त्यांनी विद्यापीठातील अधिकारी व व्यवस्थापन परिषद सदस्य यांच्याशी संवाद साधला. विद्यापीठाला पुढे घेऊन जाण्यासाठी शासन स्तरावरून मदत देण्याबाबत त्यांनी विद्यापीठाला आश्वासित केले. विद्यापीठाच्या विविध उपक्रमाबद्दल बाबत अजित पवार यांना माहिती देण्यात आली.
> **- प्रा. डॉ. सुरेश गोसावी, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.**

# भीमाशंकर कारखान्याने ऊस वेळेवर न तोडल्यास आंदोलन

## प्रशासन कर्मचाऱ्यांच्या तोंडाला काळे फासू : देवदत्त निकम यांचा इशारा

**पुणे | प्रतिनिधी**

भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याने शेतकऱ्यांचा नियमित नोंद केलेला ऊस वेळेवर न तोडल्यास या कारखाना प्रशासनाला काळे फासण्याचा इशारा भीमाशंकर सहकारी साखर कारखाना माजी अध्यक्ष देवदत्त निकम यांनी दिला आहे. आंबेगाव तालुक्यातील पारगाव येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत देवदत्त निकम बोलत होते. या पत्रकार परिषदेस शरद बोंबे, संजय बढेकर विनायक लोंढे आदी उपस्थित होते.



विधानसभेच्या निवडणुकीमुळे सहकारी साखर कारखाने उशिराने सुरू झाले. यामुळे ऊसतोड तीन महिने उशिरा झाली. अनेक शेतकऱ्यांचा १९ ते २० महिन्यांचा ऊस शेतात तोडणीवाचून राहिला आहे. त्यामुळे उसाच्या पिकात घट झाली. त्यामुळे शेतकऱ्याला आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. उशिरा तोड झाल्याने शेतकऱ्याला अन्य पिके घेता येत नाही. यामुळे गहू ,कांदा ही पिके शेतकऱ्याला घेता येत नाही. कांदा पिके घेण्यासाठी शेतकऱ्याची कांदारोपे वाया गेली. यामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले. या ठिकाणी शेतकऱ्यांची नोंद केलेला ऊस उशिराने तोडत आहेत. यामध्ये वशिलेबाजीपण दिसून येत आहे. काही गावांमध्ये नोंद केलेला ऊस तोडला जात नाही, त्यामध्ये पिंपरखेड परिसरात मोठ्या प्रमाणात ऊस असून त्यामुळे ऊस तोडला जात नसल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे.

भीमाशंकर सहकारी साखर कारखान्यांनी नोंद केलेला खत औषध घेतलेला ऊस खाजगी पराग कारखान्याला नेला जात आहे. तसेच लांबून भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याला आणला जातो आणि शेतकऱ्याचा नोंद केलेला ऊस तोडणी वाचून तसाच राहिला जातो. भीमाशंकर ने कारखान्याने पहिला हप्ता तीन हजार रुपये द्यावा, असा आग्रह मी संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये सांगितला. परंतु संचालक मंडळांनी त्याच्याकडे दुर्लक्ष केले.

ज्यावेळेस मी शेतकऱ्यांच्या बाजूने संचालक मंडळ बैठकीत पहिला हप्ता ऊस तोडणीसंदर्भात आग्रही भूमिका घेत आहे. परंतु सर्व संचालक एका बाजूने यासंदर्भात शेतकऱ्याची बाजू मांडत आहे भीमाशंकर कारखान्यात वीज प्रकल्पातून तसेच इथेनॉलमधून उत्पन्न मिळत आहे. यामुळे शेतकऱ्यांना तीन हजार रुपये पहिला हप्ता मिळाला पाहिजे. अनेक शेतकऱ्यांचा ऊस जळाल्यामुळे यामध्ये मोठ्या प्रमाणात जळीत कपात केली जाते यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

> भिमाशंकर कारखान्याचा कारभार पारदर्शकपणे चालू असून उस उत्पादक शेतकऱ्यांचा ऊस नियमाप्रमाणे तोडला जात आहे. देवदत्त निकम हे सवंग लोकप्रियतेसाठी कारखान्यावर आरोप करत आहेत.
> **- बाळासाहेब बेंडे, अध्यक्ष, भिमाशंकर सहकारी कारखाना.**